**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. ४५३/२०२३**

**निशाणी २७ लगत आदेश**

( शोभा विरुध्द बाळासाहेब व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी विरुध्द वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दावा केला आहे. प्रतिवादी यांना वेळेत महत्वाची कागदपत्रे मिळाली नसल्याने त्यांना कैफियत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देण्यास ४ महिने १७ दिवस विलंब झाला आहे. सदरचा विलंब माफ होणे आवश्यक आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे व प्रतिवादींचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादी यांनी अर्जात संयुक्तिक कारण दिले नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करावयाचा झालेस जास्त खर्च देण्याचे आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व

निरंतरची ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी रु. २००/– दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी दंडाचे रकमेपैकी रु. १००/– न्यायालयात शासन नावे जमा करावेत व उर्वरित रु. १००/– वादी यांना अदा करावेत.

३. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.10.19 17:39:59 +0530

सांगोला.
दिनांक – १९/१०/२०२४.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/10/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 21/10/2024 |